महा.-४४६/२०१०एफ११२६३
स्थापना : २०११
संस्थेचे बँक खाते क्र. : 42247766630
Ifsc : SBIN0020043
शेलगाव(जं.)
श्री संत नामदेव महाराज
(चिं.मा)बउद्देशीय सामाजिक संस्था शेलगाव (जं.)
ता.- कळंब जि.- धाराशिव
* संस्थेचे मुख्य कार्य *
१) सर्व समाजामध्ये वाढलेली व्यसनाधीनता कमी करणे.
२) सर्व समाजामधील गरीब कुटुंबातील शाळकरी मुलामुलींना शालेय साहित्य व कपडे वाटप करणे. ३) गोशाळा चालवणे. (सदरील संस्था ही 80G, व 12Ap नुसार असून, सदर संस्थेत मदत करून, सामाजिक कार्यास सढळ हाताने मदत करून सहकार्य करावे, ही नम्र विनंती.)
कार्यालय पत्ता : बाबा नगर, तवले निवास, कळंब, ता. कळंब जि. धाराशिव
अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२२१४९९९८,९७६३२५३२८०,९६६५२१२५९२

दैनिक
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
अचूक वेध, अचूक बातमी
newsaksharaj2021@gmail.com
संपादक : विनोद कैलास गोरे

फ्रेंचाईजी देणे आहे
AGRIBLE GLOBAL TRADE PRIVATE LIMITED
Shree Masala
गुंतवणूक २.५ लाख फक्त
आमच्या नामांकीत कंपनीची
संपुर्ण महाराष्ट्रात डिस्ट्रीब्यूटरशिप देणे आहे
--- आमची वैशिष्ट्ये ---
५ दिवसात व्यवसाय सुरू
कमी भांडवल जास्त नफा
स्वस्त आणि मस्त प्रोडक्ट
कुणीही हा व्यवसाय करु शकते
सहज, सरळ व सोपा व्यवसाय
तुम्हाला काहीही बनवायचे नाही
ग्राहकांची वाढती मागणी
आमच्या मसाला प्रोडक्ट ची शाखा घ्या व भरपुर प्रॉफीट मिळवा...
संपर्क : ८०८०४९१८६९

• वर्ष ३ रे • अंक २६५ वा • पाने ४
बुलडाणा, रविवार, दि.०५ मे २०२४
• RNI NO. : MAHMAR/2022/82056 • किंमत : ३ रुपये


# मोदी पुन्हा पंतप्रधान झाल्यास हुकूमशाही

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०४, सोलापूर :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची वाटचाल थेट हुकूमशाहीकडे होत असून ते पुन्हा तिसऱ्यांदा पंतप्रधान झाल्यास हुकूमशाहीमुळे कोणालाही त्यांच्या विरोधात बोलता येणार नाही. जो बोलेले, त्याला अटक होईल. मी तर मंत्री होतो.

त्यामुळे प्रथम मलाच तुरुंगात जावे लागेल, असा भीतीयुक्त इशारा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे यांनी दिला आहे.





सोलापूर लोकसभा निवडणुकीत कोळी समाजाने काँग्रेसला दिलेल्या पाठिंब्यानंतर विजापूर रस्त्यावरील माशाळ वस्तीत समाजाचा मेळावा पार पडला. त्यावेळी शिंदे बोलत होते.

ते म्हणाले, दहा वर्षांपूर्वी नरेंद्र मोदी यांच्यावर जनतेने मोठा विश्वास ठेवून आणि भूलथापांना बळी पडून त्यांच्या हाती सत्ता सोपविली होती. परंतु मोदी यांना आता सत्तेची चटक लागली आहे.

यंदाची लोकसभा निवडणूक अधिक महत्वाची असून हुकूमशाही विरुद्ध लोकशाहीची ही लढाई असल्याचे त्यांनी सांगितले. शिंदे यांनी वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांच्यावरही टीकास्त्र सोडले. लोकसभा निवडणुकीनंतर संभाव्य चौकशी टाळण्यासाठी सुशीलकुमार शिंदे व प्रणिती शिंदे भाजपमध्ये प्रवेश करतील, असे भाकीत आंबेडकर यांनी सोलापुरात केले होते. त्यास प्रत्युत्तर देताना, प्रकाश आंबेडकरांचा बोलावता धनी कोण आहे, हे नव्याने सांगण्याची गरज नाही, अशी प्रतिक्रिया व्यक्त केली.

आपण मुलगी प्रणितीसह भाजपमध्ये जाणार असल्याच्या अफवा वारंवार पसरविल्या जातात. आमचा जन्म काँग्रेससाठी झाला आहे. आम्हाला काँग्रेसने घडविले आहे. आमच्या रक्तातच काँग्रेस आहे, असा दावा त्यांनी केला.



शनिवार दि.०४,चे सजलेले श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती बाप्पांचे सुंदर रूप
।। गणाधीशा भालचंद्रा गजवक्रा गणराया,
वक्रतुंडा धुम्रवर्णा गणपती बाप्पा मोरया ।।

# मालवाहू वाहनाची दुचाकीला धडक, अत्यावस्थ इसमाला जंगलात दिले फेकून

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०४, बुलढाणा :** मालवाहू वाहनाच्या चालकाने दिलेल्या धडकेत दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला. उपस्थित नागरिकांच्या भीतीने त्याला दवाखान्यात भरती करण्याचा बहाणा करीत त्याला वाहनात टाकून अत्यावस्थ स्थितीत जंगलात फेकून दिले. यामुळे अपघातग्रस्त इसमाचा उपचाराभावी करुण अंत झाला.




माणुसकीला काळिमा फासणारी व क्रूरतेचे प्रदर्शन करणारी ही घटना जळगाव जामोद तालुक्यातील आदिवासीबहुल परिसरात घडली. जळगाव जामोद पोलीस ठाणे हद्दीतील निमखेडी ते सुनगाव मार्गावर मालवाहू वाहन (क्रमांक एम एच २७ बी ५३८२ )च्या चालकाने दुचाकी (क्रमांक एम एच २८ एच ९१८९ ) ला धडक दिली. दुचाकीस्वार मनसाराम छत्तरसिंग वासकले (राहणार मेंढामारी) हा गंभीर जखमी झाला. यावर चालकाने गयावया करून जखमीला तातडीने दवाखान्यात नेतो अशी बतावणी केली. चालकाने त्याला वाहनामध्ये टाकले. मात्र बुऱ्हाणपूर मार्गावरील शांतीलाल सस्त्या यांच्या शेतालगतच्या निर्मनुष्य जंगलात फेकून दिले. जखमीला उपचार न मिळाल्याने त्याचा मृत्यू झाला. दरम्यान मृताचा भाऊ गमदास छत्तरसिंग वासकले यांनी जळगाव जामोद पोलिसात फिर्याद दिली. जळगाव जामोद पोलिसांनी आरोपी चालका विरोधात कलम २७९, ३३७, ३०४, २०१ भांदवी सह १३४, १८६ मोटर वाहन कायदा प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. यानंतर तपासचक्रे फिरवून आरोपी चालक योगेश सोपान महाजन (राहणार बोरसर ) यास शिताफीने अटक केली. ठाणेदार आनंद महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली 'एपीआय' इंगळे , जमादार प्रेमसिंग पवार हे तपास करीत आहेत.

99309 04204
91373 69085
साई डेकोर
90828 46314
90828 32909
टोटल इंटेरिअर सोल्यूशन्स
वॉलपेपर
कार्पेट
बाइन्ड्स
फ्लोरिंग पीव्हीसी/वूडन
जिम फ्लोरिंग
ग्लास फिल्म्स
साइन बोर्ड
आर्टिफिशियल ग्रास
साई डेकोर, शॉप नं.०२, शिवचंद यादव चाळ, मॉडेल टाऊन समोर, महाकाली लेणी रोड, अंधेरी, मुंबई

## थोडक्यात

### 'लक्झरी' व एसटीच्या धडकेत महिला ठार, २५ जखमी



**दि.०४, बुलढाणा :** खाजगी बसने (ट्रॅव्हल) महामंडळाच्या एसटीला धडक दिल्याने झालेल्या अपघातात एक महिला ठार झाली, तर सुमारे २५ प्रवासी जखमी झाले. मेहकर चिखली मार्गावर आज रविवारी( दि ४) ही दुर्घटना घडली. राज्य परिवहन महामंडळाची बुलढाणा ते अहमदपूर बस ( एम.एच २० बीएल २३७७) आज बुलढाणा आगारातून रवाना झाली. दरम्यान मेहकर चिखली मार्गावर धावणाऱ्या एसटीला मागून भरधाव वेगाने येणारी एक लक्झरी बस धडकली. यामुळे अंजली गोपाल शर्मा ( २६, चिखली जिल्हा बुलढाणा) या महिलेचा मृत्यू झाला. २५ प्रवासी जखमी झाले आहेत. महामंडळाचे राहुल देशमाने, समाधान जुमडे, प्रविण तांगडे तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. मेहकर पोलीस ठाण्याचे सहाय्यक फौजदार रमेश बाजड, हवालदार शिवानंद केदार हे देखील कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी पोहोचले. अपघातात दोन्ही वाहनांचे नुकसान झाले आहे. जखमींवर मेहकर येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहे. त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे रुग्णालय सूत्रांनी सांगितले.

### लाच घेणाऱ्या अधिकाऱ्याला अटक

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०४, मुंबई :** चार लाखांची लाच घेतल्याच्या आरोपाखाली प्राप्तीकर अधिकाऱ्याला शुक्रवारी केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) अटक केली. मालमत्ता विक्रीबाबत टीडीएस प्रमाणपत्र जारी करण्यासाठी आरोपीने लाच स्वीकारल्याचा आरोप आहे. याप्रकरणी सीबीआय अधिक तपास करत आहे. विकास बन्सल असे अटक करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे नाव आहे. ते नरीमन पॉईंट येथील एअर इंडिया इमारतीच्या १७ व्या मजल्यावर कार्यरत होते. याप्रकरणी सीबीआयने दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदाराचे मामा अनिवासी भारतीय आहेत.



# कर दहशतवाद नष्ट करणार उद्धव ठाकरेंची घोषणा

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०४, धाराशिव :** शिवरायांनी स्वराज्य उभे करण्यासाठी गुजरातमध्ये जाऊन त्यावेळी सुरतेवर छापा टाकला. आता त्या गुजरातचे दोघेजण महाराष्ट्र लुटत आहेत. आपण केवळ रडगाणे गात रहायचं नाही. तुम्ही सरकार उलथून टाका मी आपलं सरकार आल्याबरोबर जाचक कायदे रद्द करतो. शेतकरी आणि व्यापारी वर्ग मोदी सरकारने जीएसटीच्या कचाट्यात पकडले आहेत. हा कर दहशतवाद आपण नष्ट करून टाकणार असल्याचे आश्वासन उद्धव ठाकरे यांनी धाराशिव येथे दिले.



महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांच्या प्रचारार्थ धाराशिव शहरातील जिल्हा परिषद प्रशालेच्या मैदानात आयोजित करण्यात आलेल्या जाहीर सभेत ते बोलत होते. यावेळी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, आमदार कैलास पाटील, माजी नगराध्यक्ष मकरंद राजेनिंबाळकर, माजी आमदार ज्ञानेश्वर पाटील, माजी आमदार राहुल मोटे यांच्यासह महाविकास आघाडीचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. सोयाबीनला भाव नाही, कापसाच्या भावाचे वांदे झाले आहेत, तर कांदा निर्यातबंदीमुळे शेतकरी मेटाकुटीला आला आहे. केवळ निर्यातबंदी केली आहे असे रडगाणे गात बसण्याला अर्थ नाही. निर्यात बंदी मोडून काढायची असेल तर हे सरकार पाडून टाकायला हवे. तुम्ही हे सरकार उलथवून टाका, कांद्याची निर्यात बंदी कायमची दूर करण्याची जबाबदारी माझी आहे. इंडिया आघाडीचे सरकार देशात येणार आहे. घरगड्याप्रमाणे सगळ्या शासकीय यंत्रणा वापरणाऱ्यांना आपण वठणीवर आणल्याशिवाय राहणार नसल्याचा इशाराही उद्धव ठाकरे यांनी यावेळी दिला.

नरेंद्र मोदी यांना आपल्याविषयी प्रेम असल्याचे ऐकून आनंद झाला. मलाही त्यांच्याविषयी मनात प्रेम आहे. मात्र ज्यावेळी आपल्यावर शस्त्रक्रिया झाली होती त्यावेळी महाराष्ट्रातील सरकार पाडण्याचे षडयंत्र करणाऱ्या मोदींच्या चेल्याचपाट्यांना या प्रेमाची जाणीव नव्हती का ? असा सवालही ठाकरे यांनी यावेळी उपस्थित केला.

मशाल चिन्ह घेऊन आपण रणांगणात उतरलो आहोत. आपल्या सगळ्यांच्या आशीर्वाद घेऊन मशालीच्या माध्यमातून दिल्लीचे तक्त जाळून टाकल्याशिवाय आपण स्वस्थ राहणार नाही. नरेंद्र मोदी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब यांचे कर्ज मान्य करत असतील तर त्याच बाळासाहेबांच्या खोलीत अमित शहा यांनी दिलेले वचन मोदींना माहीत नव्हते काय ? असा सवालही ठाकरे यांनी यावेळी उपस्थित केला.

आज मोदींवर गॅरंटी म्हणून महाराष्ट्रातल्या प्रत्येक जिल्ह्यात आणि गल्लीबोळात फिरण्याची वेळ आली आहे. तरुणांच्या हाताला रोजगार नाही, शेतकऱ्याच्या मालाला भाव नाही, सर्वांना हक्काचे घर देणार होते तेही खोटे ठरले. त्यामुळे गॅरंटीच्या नावावर खोटे कोण बोलत आहे हे सर्वांना माहीत आहे. त्यामुळेच मी केंद्रातल्या सरकारला मोदी सरकार नव्हे तर गजनी सरकार म्हणून संबोधतो, कारण मागील निवडणुकीत कोणते वचन दिले होते हेही यांना आठवत नाही. गोमूत्रदारी हिंदुत्व, बुरसटलेले हिंदुत्व अंगिकारणारी ही मंडळी याना आंबेडकरांनी दिलेले संविधान मान्य नाही.

त्यामुळेच त्यांचा त्रागा सुरू आहे. निवडणूक आयोगाच्या माध्यमातून, विविध शासकीय यंत्रणांच्या माध्यमातून विरोधकांवर दबाव आणला जात आहे. याद राखा इंडिया आघाडीचे सरकार आल्यानंतर गाठ आमच्याशी आहे अशा शब्दात उद्धव ठाकरे यांनी यावेळी शासकीय यंत्रणांनाही सज्जड दम दिला.

चाय पे चर्चा करण्याची मोदींना मोठी हौस आहे त्यापेक्षा यंत्रणा वापरून दरोडे घालण्यात मश्गुल असलेल्या केंद्र सरकारने स्वतःच्या कामावर चर्चा करावी. मागील अडीच वर्षात आपण केलेल्या कामांमुळे महाराष्ट्रातील जनता आज खंबीरपणे आपल्या पाठीशी उभी आहे आणि या निवडणुकीत त्याचा प्रत्यय आल्याखेरीज राहणार नाही. मोठ्या मताधिक्याने मशाल चिन्हासमोरील बटन दाबून ओम राजेनिंबाळकर यांना विजयी करा असे आवाहनही ठाकरे यांनी यावेळी केले.




## एकमेकांची उणीधुणी

लोकसभा निवडणुकांचे २ टप्पे पार पडले असले, तरी अनेक ठिकाणच्या निवडणूका अद्याप शेष असल्याने प्रचाराला आता अधिक गती येऊ लागली आहे. सर्वच पक्षातील नेतेमंडळी आजमितीला रस्त्यावर उतरून प्रचाराला लागली आहेत, मोठमोठ्या रॅली निघत आहेत, हजारोंच्या सभा घेतल्या आहेत. खाणे-पिणे, विश्रांती या सर्वांकडे दुर्लक्ष करून आज प्रत्येक राजकीय नेता जीवघेण्या उन्हातही प्रचारासाठी राब राब राबतो आहे. सोबत कार्यकर्त्यांचा फौजफाटाही तितक्याच प्रमाणात झिजतो आहे. समस्त भारतभूमीला आज रणांगणाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. युद्धात ज्याप्रमाणे रथी शत्रुपक्षातील रथीशी आणि महारथी महारथीसोबत लढतो त्याप्रमाणे पक्षाची वरिष्ठ मंडळी अन्य पक्षांच्या वरिष्ठांना लक्ष करत आहेत तर राज्य स्तरावरील मंडळी समोरील पक्षाच्या राज्यस्तरावरील प्रमुखाला टीकेचा धनी करत आहेत. एकमेकांची उणीधुणी काढताना अनेक जण पातळ्या ओलांडत आहेत. गेल्या दोन वर्षांत राज्यातील राजकारणात अनेक स्थित्यंतरे झाल्याने कधीकाळी एखाद्यावर विश्वास टाकून खाजगीत सांगितलेल्या गोष्टी आज प्रचारसभांतून चव्हाट्यावर मांडल्या जात आहेत. सत्तेत आल्यावर आम्ही नागरिकांसाठी काय काय करू हे सांगण्यापेक्षा समोरच्या पक्षातील मंडळी किती भ्रष्ट आणि खोटारडी आहेत याबाबतच्या गोष्टी रंगवून सांगण्यामध्ये राजकीय नेत्यांना यावेळी अधिक स्वारस्य जाणवते आहे. सर्वच पक्षांच्या सभांमध्ये आज हेच चित्र दिसून येत आहे. टीका करताना अनेक नेतेमंडळी शत्रुपक्षाच्या नेतेमंडळींच्या खासगी आयुष्यातील घटनांनाही विनाकारण उगाळताना दिसून येत आहेत. एकाने टीका केली म्हणून त्याला उत्तर देण्यासाठी समोरील पक्षाचा नेताही तितकीच जहरी टीका करण्याचा प्रयत्न करताना दिसतो आहे. वृत्तवाहिन्यांचे प्रतिनिधी या वाकयुद्धामुळे निर्माण झालेल्या भडक्यात तेल ओतण्याचे काम करत आहेत. अनेक ठिकाणी सभांमध्ये व्यासपीठावर आणि प्रेक्षकांमध्ये महिलावर्ग उपस्थित आहे याचेही भान नेतेमंडळींना राहिलेले दिसत नाही. जो नेता गेल्या लोकसभा निवडणुकीत एका पक्षाचा प्रचार करत होता तोच नेता यंदा जाहीर सभांतून त्याच पक्षाचे वाभाडे काढताना दिसतो आहे. अशा पक्षबदलू मंडळींच्या जुन्या ध्वनिचित्रफिती निवडणुकांच्या काळातच सामाजिक माध्यमांतुन व्हायरल केल्या गेल्याने त्या पाहणाऱ्यांचे चांगलेच मनोरंजन घडत आहे. सामान्य जनतेला निवडणुकांच्या माध्यमातून देशाला योग्य नेतृत्व द्यायचे आहे आणि आपल्या विभागाची काळजी घेणारा, लोकांच्या हाकेला धावून येणारा, विभागातील जनतेची कामे करणारा, जनतेच्या समस्या सोडवणारा, विभागाचा विकास घडवून आणणारा, आपल्या मतदानक्षेत्राशी कृतज्ञतेने वागणारा खासदार निवडायचा आहे. जनता सुज्ञ असल्याने ती योग्य तो निर्णय घेऊन आपल्या विभागातून योग्य उमेदवार निवडून आणणारच आहे. राजकीय सभांतून केल्या जाणाऱ्या टीकाटिपणीशी, आरोप प्रत्यारोपांशी सामान्य जनतेला काहीच देणेघेणे नाही तरीही राजकीय पक्ष इतरांची उणीधुणी काढण्यात अधिक स्वारस्य का दाखवत आहेत ? राज्याच्याच राजकारणाचा विचार केल्यास गेल्या वीस वर्षांत राज्यातील जनतेने सर्वच राजकीय पक्षांना राज्याची सत्ता चाखण्याची संधी दिली आहे, त्यामुळे कोणाची किती पात्रता आहे. कोणता पक्ष आणि कोणता नेता भ्रष्ट आहे आहे, कोणाला जनतेची काळजी आहे याबाबत नागरिकांचा चांगलाच अभ्यास झाला आहे. त्यामुळे राजकीय नेत्यांनी इतरांवर टीकाटिपणी करून आपली पात्रता लोकांसमोर उघडी करण्याऐवजी येणाऱ्या पाच वर्षांत देशाच्या पर्यायाने समाजाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी, बाह्य आणि देशांतर्गत सुरक्षेसाठी, नागरिकांची शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक स्थिती सुधारणेसाठी, शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी आणि त्यांच्या विकासासाठी, महागाई आटोक्यात आणण्यासाठी, लोकसंख्या नियंत्रणासाठी, आणि देशात सुराज्य आणण्यासाठी काय प्रयत्न करणार याबाबत ठामपणे आणि प्रतिज्ञापूर्वक सांगितल्यास त्यांच्याप्रती नागरिकांचा विश्वास निमर्ण होण्याची संधी अधिक बळावू शकते. स्वातंत्र्यपूर्व काळात नेताजी सुभाषबाबूंनी 'तुम मुझे खून दो मैं तुम्हे आजादी दूंगा' म्हणताच क्षणी लाखोंच्या संख्येने तरुण पुढे आले. महात्मा गांधींनी 'चले जाव' ची हाक देताच लाखो देशभक्तांच्या समूह गांधीजींच्या नेतृत्वाखाली एकवटला. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या मार्गदर्शनाखाली देशासाठी प्राणार्पण करणाऱ्या तरुणांचा प्रचंड मोठा गट पुढे आला. इंग्रजांनी नागरिकांवर किती अत्याचार केले याचा केवळ पाढा न वाचता त्या इंग्रजांना देशातून हाकलून लावण्यासाठी लढा उभारून जनतेला त्यात सहभागी होण्याचे आवाहन करणारी असंख्य थोर मंडळी या देशात होऊन गेली. या मंडळींच्या नेतृत्वाखाली अनेकांनी आपल्या घरादारावर तुळशीपत्र ठेवले, कित्येकांनी आपल्या प्राणांचीही बाजी लावली. या मंडळींनी घेतलेल्या पुढाकारामुळे आणि केलेल्या त्यागामुळे आज आपण स्वातंत्र्याची फळे चाखतो आहोत. या सर्वांचे एकच ध्येय होते आणि ते म्हणजे या मातृभूमीला इंग्रजांच्या जोखडातून मुक्त करून स्वातंत्र्य आणणे. आज किती राजकीय पक्षांचे ध्येय देशात सुराज्य आणण्याचे आहे आणि कीतींचे ध्येय सत्तेचा मलिदा लाटण्याचे आहे हे जनता चांगलेच ओळखून आहे.

# विवाह संस्कारातील धार्मिक विधींचे महत्व न्यायालयाकडूनही अधोरेखित !

**हिंदु विवाहामध्ये जर आवश्यक ते विधी झाले नाहीत, तर तो विवाह ग्राह्य धरता येणार नाही. असे विवाह निरर्थक समजले जातील. नोंदणी केली, तरी हे विवाह वैध रहाणार नाहीत; कारण हिंदु विवाहामध्ये सप्तपदीसारखे विधी अतिशय महत्त्वाचे आहेत, असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने एका प्रकरणाच्या सुनावणीच्या वेळी दिला.**

न्यायमूर्ती बी. नागरत्ना यांच्या खंडपिठाने हा निर्णय दिला. 'वादविवादांच्या प्रकरणात असे विधी पुरावा म्हणून ग्राह्य धरले जातात', असेही न्यायालयाने स्पष्ट केले आहे. हिंदु विवाह हा एक संस्कार असून विवाहाला भारतीय समाजात एक महत्त्वाची संस्था म्हणून दर्जा मिळायला हवा. तरुणांनी विवाहाचा विचार करतांना भारतीय समाजात विवाह संस्था ही किती पवित्र आहे, याचा विचार करायला हवा. हे सांगतानाच न्यायालयाने विवाह म्हणजे नाच-गाणे, जेवणे, मद्य पिणे किंवा हुंड्यासह अनावश्यक वस्तूंची देवाण-घेवाण करण्याचा कार्यक्रम नाही. हा भारतीय समाजातील एक महत्त्वाचा समारंभ आहे. या समारंभाद्वारे स्त्री आणि पुरुष यांच्यात एक विशिष्ट नाते निर्माण होते, त्यांना पती-पत्नीचा दर्जा दिला जातो. या गोष्टीकडे लक्ष वेधले आहे. न्यायालयाच्या या निर्णयातून आणि त्यासंदर्भातील टिपणीतून हिंदू धर्मातील विवाह संस्कारातील विविध धार्मिक विधींचे महत्व पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

हिंदू धर्मात १६ संस्कारांना विशेष महत्व आहे. त्यातील १५ वा संस्कार म्हणजेच विवाहसंस्कार. हा सर्वात महत्वाचा संस्कार समजला जातो. या संस्कारात केल्या जाणाऱ्या प्रत्येक विधीचे विशिष्ट महत्व असून हा संस्कार करताना पुरोहित त्या विधीचे महत्व उभयतांना सांगत असतात. विवाह म्हणजे केवळ दोन देहांचे मिलन नसून यानिमित्ताने दोन कुटुंबे, दोन मने एकमेकांशी जोडली जातात. देवाब्राह्मणांच्या साक्षीने पती पत्नी आयुष्यभर एकमेकांच्या सोबत राहण्याचे, सुख दुःखात एकमेकांना साथ देण्याचे, एकमेकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचे वचन देतात. अग्निभोवती प्रदक्षिणा घालण्याआधी अर्ध्यदान करून होमाग्नी प्रज्वलित केला जातो. वधूचा हात हातात घेऊन वर या होमाभोवती मंत्रोच्चारासह प्रदक्षिणा घालतो. याच वेळी वधु सप्तपदी चालते. अन्नलाभासाठी पहिले, ऊर्जेसाठी दुसरे, समृद्धीसाठी तिसरे, सुखसमृद्धीसाठी चौथे, उत्तम संततीसाठी पाचवे, विविध ऋतूंच्या सुखासाठी सहावे आणि मैत्रीच्या सहृदय नात्यासाठी वधू-वर एकत्रपणे सातवे पाऊल चालतात. याला सप्तपदी असे म्हणतात. शुद्धतेचे आणि समृद्धीचे प्रतीक असलेले तूप आणि लाह्या वधू वर होमात अर्पण करतात. ईशान्य दिशा ही अपराजित दिशा असल्याने ईशान्य दिशेकडे जाणारी सप्तपदी यावेळी मांडली जाते. सप्तपदी चालल्यानंतर आकाशातील ध्रुव ताऱ्याला नमस्कार करून ध्रुव ताऱ्याप्रमाणे संसारात अचल राहण्याचे आणि आजन्म एकमेकांना साथ देण्याचे वचन दिले जाते. पाणीग्रहणानंतर व्यक्तीच्या गृहस्थाश्रमाचा आरंभ होतो. पती पत्नीमधील शारीरिक संबंधांना केवळ वंशवृद्धिपुरते महत्व असून आत्मिक मिलनाला विशेष महत्व आहे. भावी आयुष्यात पती पत्नीने एकमेकांना पूरक राहण्याच्या दृष्टीने विवाह संस्कार अत्यंत महत्वाचा मानला जातो.



विवाह संस्कारामध्ये श्री गणेश पूजन, सीमांतपूजन, मधुपर्कपूजन, गौरीहरपूजन, कन्यादान, मंगळसूत्र बंधन, अक्षतारोपण, मंगलाष्टके, विवाह होम, पाणिग्रहण, लाजाहोम, सप्तपदी, गर्भाधान असे अनेक विधी असतात. या प्रत्येक विधीच्या वेळी म्हटले जाणारे मंत्र, केलया जाणाऱ्या कृती यामागे ऋषीमुनींचा संकल्प कार्यरत असतो, त्यामुळे या विधी भावपूर्ण होणे अत्यंत महत्वाचे असते. विवाह संस्कार म्हणजे उभयतांना केवळ सहचर्य करण्याची अनुमती देणारा संस्कार नसून भावी जीवनात धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष यांची सांगड घालण्याची शिकवण देणारा संस्कार आहे. एकमेकांना त्यांच्या दायित्वाची जाणीव करून देणारा संस्कार आहे. त्यामुळे हा विधी आणि संस्कार शास्त्रशुद्धरीतीने झाल्यास उभयतांचे भावी जीवन सुखकर, आरोग्यमय आणि समृध्दीमय होते अशी लोकांची श्रद्धा आहे. एकूणच विवाहसंस्कारात नियोजित विधींना अधिक महत्व देण्यात आले आहे.

सध्याचे विवाह पाहता स्थिती पूर्णपणे बदलली आहे. सध्याच्या घडीला विवाहातील धार्मिक विधींपेक्षा अन्य गोष्टींना आणि कृत्रिम अवडंबराला अधिक महत्व प्राप्त होऊ लागले आहे. विवाह संस्कारात अनेक अनिष्ट बाबींचा शिरकाव झाला आहे, ज्यामुळे विवाहातील मुख्य विधींनाच बगल दिली जात आहे. विवाहासारख्या धार्मिक कार्यक्रमाचाही इव्हेन्ट होऊ लागला आहे, ज्यामुळे त्यातील सात्विकताच लोप पावू लागली आहे. राज्यासह देशातील विविध प्रांतात आणि समाजामध्ये विवाह जमवण्यासाठी आजही हुंडा दिला आणि घेतला जातो. हुंडाप्रथेला कायद्याच्या कक्षेत आणूनही यामध्ये फारसा फरक पडलेला नाही. हुंडा देण्याघेण्यामध्ये दुर्दैवाने उच्चशिक्षित कुटुंबे अग्रणी असतात. हुंड्याच्या लोभामुळे केल्या गेलेल्या छळामुळे दरवर्षी कितीतरी नववधू आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलतात. व्हाट्सअप आणि टेलिग्रामसारखी अद्यावत संपर्क साधने असताना आजही अनेक जण आत्मप्रौढीसाठी महागड्या पत्रिका छापतात. काही भागांत तर विवाहनिमित्त मोठमोठे बॅनर्स आणि होर्डिंग्सही लावले जातात. प्री वेडिंग फोटो आणि व्हिडीओ शूटसाठी लाखो रुपये खर्च केले जातात. हे फोटो किंवा व्हिडीओ शूट पाहण्यामध्ये लग्नाच्या एक वर्षानंतर वधूवरांनाही फारशी रुची राहिलेली नसते. विवाहातील स्वागत समारंभासाठी महागडे कपडे शिवले जातात जे वधु वरांकडून भविष्यात खचितच वापरले जातात. हल्ली तर विवाह समारंभ संस्मरणीय करण्यासाठी इव्हेन्ट मॅनेजमेंट कंपन्यांना कंत्राट दिले जाते. या कंपन्या धार्मिक विधींपेक्षा सोहळा अधिकाधिक मनोरंजक आणि आकर्षक कसा होईल याकडे अधिक लक्ष देतात. यांच्याकडून विवाह विधी थोडक्यात आटोपण्याकरीता काहीवेळा पुरोहितांवर दबाव टाकला जातो. आलेल्या पाहुण्यांच्या मनोरंजनासाठी याच कंपन्यांकडून वधु-वरांचे आणि त्यांच्या नातेवाईकांचे सिनेगीतांवर नृत्य बसवले जातात, विवाह विधीनंतर त्याचे विशेष सादरीकरण असते. स्टेजवर लोकांसमोर नाचायचे आहे, तर सर्व व्यवस्थितच व्हायला हवे यासाठी अनेक जवळचे नातेवाईक लग्नाच्या तयारीत हातभार लावण्यापेक्षा या नृत्याच्या तयारीतच अधिक व्यस्त असतात. विवाहाप्रित्यर्थ उपस्थितांना प्रीती भोजन दिले जाते. हे भोजन वधु वरांच्या कुटुंबाच्या ऐपतीनुसार दिले जायला हवे; मात्र इथेही आत्मप्रौढीसाठी भोजनात नको तितक्या पदार्थांची रेलचेल पाहायला मिळते. काही ठिकाणी भोजनासाठी शाकाहार आणि मांसाहार असे वेगवेगळे कक्ष उभारले जातात.

याशिवाय चायनीज, इटालियन पदार्थांचे कक्ष उभारण्याचीही पद्धत हल्ली रूढ होत चालली आहे. विवाहानंतर मंजुळ आवाजाच्या पारंपरिक वाद्यांनीशी वधु -वरांची वरात काढण्याची प्रथा लोप पावत चालली आहे. हल्ली वरातीसाठी डीजे, बेण्डबाजा आणि कानठळ्या बसवणाऱ्या फटाक्यांच्या आतषबाजीसाठी हजारो रुपये उधळले जातात. याशिवाय मित्र मंडळींना मद्याच्या आणि मांसाहाराच्या मेजवान्या देण्यासाठी खर्च होतो तो वेगळाच. लग्न सोहळ्यासाठी खरेतर आपल्या ऐपतीप्रमाणेच खर्च केला जावा; मात्र 'लोकांना काय वाटेल' या विचाराने वर-वधूच्या कुटुंबियांकडून लग्न सोहळा दिमाखात पार पडावा यासाठी कर्ज काढून नको त्या गोष्टीसाठी नको तेव्हढा खर्च केला जातो. त्यामुळे विवाह संस्कारातील धार्मिक विधी राहतात बाजूला आणि अनावश्यक बाबींसाठी पाण्यासारखा पैसा खर्च केला जातो. लग्नानंतर गृहस्थाश्रम आरंभ होतो. नवा संसार उभा करण्यासाठी जागोजागी धनाची निकड भासते; मात्र वधु-वरांची सुरुवातीची काही वर्षे लग्नासाठी काढलेल्या कर्जाचे हप्ते फेडण्यातच व्यय होतात. विवाह संस्कारामध्ये केवळ धार्मिक विधींना महत्व असून आपल्या इभ्रतीखातीर त्याला लावण्यात आलेल्या उपरोक्त बाबींचा मुलामा निव्वळ दिखाव्यासाठी असतो. आता तर न्यायालयानेच या अवडंबराची व्यर्थता लक्षात आणून देऊन विवाहातील धार्मिक विधींचे महत्व पटवून दिले आहे. यानंतर तरी लोकांना जाग येईल का ?

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

## आत्मा..

लक्ष ठेवतात जीवीत
कुठे भटकतो आत्मा
बाकी शोधतात संधी
कसा करावा खात्मा

जन कल्याण हे ध्येय
एखादा होई महात्मा
ओवाळे आपलाजीव
होई वंदनीय हुतात्मा

परोपकारी सेवे साठी
शतधन्य बने कृतात्मा
पुण्य संचय अतिप्रिय
ईश्वरांश तो अध्यात्मा

जाणतो प्रत्येकप्राण्यां
सर्वव्यापी रे परमात्मा
हृदय मंदिरा प्रतिष्ठीत
दिला सर्वां अंतरात्मा

वाचेच्या पलीकडे राहे
अत्यंतपवित्र शिवात्मा
चित्त मनाचे करे दमन
नित्यमानस नियतात्मा

सत्पात्री सदैवदानशूर
सार्थक सिध्द धर्मात्मा
अंतःसुख न् ब्रह्मानंद
ब्रह्म अनुभव स्वात्मा

- हेमंत मुसरीफ, पुणे
९७३०३०६९९६

# रेतीचा धक्का येळीचा.. उपसा मात्र महाटीतून.. प्रशासनाची मुक संमती ?

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.४, मुदखेड (नांदेड) :** महसूल प्रशासनाच्या नियंत्रणाच्या अधिन राहून लोहा तालुक्यातील येळीचा रेती धक्क्यावरून वाळू उपशाला अधिकृत परवानगी देण्यात आली.

गोदावरीच्या पात्रातून लोहा तालुक्याच्या येळीच्या बाजुने सेक्शन पंपाच्या साहाय्याने २४ तास रेतीचा उपसा चालू असुन दिवसा मात्र येळीच्या क्षेत्रातून संध्याकाळी मात्र महाटीच्या क्षेत्रातील नदीपात्रातून सदरील रेती परवाना धारकांचा राजरोसपणे महाटीच्या क्षेत्रातून रेतीचा उपसा करीत आहेत.

याकडे मुदखेड तालुक्यातील महसूल प्रशासनाचे संबंधित जबाबदार अधिकारी कर्मचारी हे सुद्धा व्यवहारात गुंतुन सोयीस्करपणे दुर्लक्ष करीत आहेत. मुदखेड तालुक्याच्या क्षेत्रांतुन रेती उपसाची कसलीच परवानगी नसताना जी रेती उपसा चालू आहे. या रेती उपसास मुदखेड तालुक्याचे उपविभागीय अधिकारी, तहसीलदार,मंडळ अधिकारी, तलाठी, पोलीस पाटील, सरपंच हे जबाबदार अधिकारी लोकप्रतिनिधी हे अर्थ पुर्ण दृष्टीने दुर्लक्ष करून मुदखेड तालुक्यातील रेती चोरीवर पांघरून घालत आहेत.



प्रशासनाच्या निर्देशानुसार सकाळी ६ ते सायंकाळी ६ या वेळेनुसार उपसा करण्याची नियम असताना रात्रंदिवस रेती उपशाला लोहा तालुक्यातील उपविभागीय अधिकारी तहसीलदार मंडळधिकारी, तलाठी, सरपंच, पोलीस पाटील मलिदेच्या अपेक्षेतून रात्रीच्या रेती उपशाला मूकसंमती देत असल्याचे येळी आणि महाटी परिसरातील नागरिक याबाबत उघडपणे बोलत आहेत.

या नियम बाह्य विषयावर कोणाचे नियंत्रण नसल्याचे प्रस्तुत घटनाक्रमांकावरुन स्पष्ट होत आहे. मांजरीच्या गळ्यात घंटी कोण बांधावी या उक्तीप्रमाणे येळीच्या रेती घाटाचा प्रकार चालू आहे याकडे जिल्हा प्रशासन लक्ष देईल का असा प्रश्न सर्वसामान्यांतून उपस्थित होत आहे.

# 'जॉय संस्थेला' माणुसकी समाजरत्न पुरस्कार

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०४ मुंबई :** गेल्या अनेक वर्षांपासून मुंबई मधे' जॉय ऑफ गिव्हिंग 'ही सामाजिक संस्था अनेक सामाजिक उपक्रम राबवित असुन कोरोना काळात देखील अनेक गरजुंना आर्थिक तसेच वस्तू रूपात लाखो रुपयांची मदत केली गेली होती. त्याच बरोबर कोकणातील पुरग्रस्तांसाठी देखील या संस्थेतर्फे मदत करण्यात आली होती. या संस्थेच्या कामाची दखल घेऊन आजवर अनेकांनी संस्थेला गौरविले आहे. प्रेरणा फाउंडेशन संस्थेच्या वतीने कल्याण येथील अत्रे नाट्यगृहात दिनांक ४ मे २०२४ रोजी मतिमंद मुलांच्या मदतीसाठी एका खास नाटकाचे आयोजन प्रेरणाच्या संस्थापक, लेखिका, समाजसेविका दीप्ती गावकर कुलकर्णी यांच्या वतीने करण्यात आले होते.यावेळी जमा झालेला निधी या बालकांच्या कल्याणासाठी दिला गेला. यावेळी महाराष्ट्र राज्यातील विविध सामाजिक संस्था आणि सामाजिक कार्यकर्ते यांना माणुसकी समाजरत्न पुरस्कार देऊन प्रमुख पाहुणे वैभव कुलकर्णी, दिलीप नारकर, जितू गुप्ता, सुनील इंगळे, गुरुनाथ तिरपणकर उपस्थित होते. यावेळी मुंबई महाराष्ट्रात सातत्याने चांगले काम अविरतपणे करीत असलेल्या जॉय ऑफ गिविंग मुंबई या संस्थेचा देखील माणुसकी रत्न हा राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. जॉय तर्फे संस्थापक गणेश हिरवे आणि जॉय चे मुंबई अध्यक्ष चंद्रशेखर सावंत यांनी पुरस्कार स्वीकारला.जॉय संस्थेचे काम उल्लेखनीय असून गणेश हिरवे सरांच्या माध्यमातून आणि पुढाकाराने संस्थेचे सभासद आणि दानशूर व्यक्तीच्या मदतीने जॉय अनेकांना सहकार्य करीत असते.कोणताही ऋतू असला तरी जॉय चे काम थांबलेले नाही.गोरगरीब विद्यार्थी, आश्रमशाळा, नैसर्गिक आपत्ती, वृद्धश्रम, आदिवासी पाडे आदी लोकांसाठी जॉय प्रामुख्याने काम करते.पुरस्कार मिळाल्याने अनेक मान्यवरांनी जॉय चे अभिनंदन केले आहे.याआधी देखील जॉय संस्थेला अनेक पुरस्कार मिळालेले आहेत.यावेळी आयोजक प्रेरणा गावकर लिखित दोन अंकी आकांत या नाटकाचा प्रयोग दाखविण्यात आला.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## कल्याण लोकसभा अपक्ष उमेदवार अश्विनी केंद्रे यांनी भरला उमेदवारी अर्ज



**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.३, डोंबिवली :** कल्याण लोकसभेच्या अपक्ष उमेदवार अश्विनी अमोल केंद्रे यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला. अश्विनी केंद्रे या अनेक प्रकारच्या आंदोलनांमधून चर्चेत आहेत, फेरीवाल्यांचा याना भरपूर पाठिंबा आहे, मागील वर्षी िॲषि जवानाच्या मागण्यांसाठी त्यानी व त्यांच्या सहकारी अश्या ७ते८ महिलांनी चक्क मुंडण करुन आंदोलन केले होते, तेव्हा ही त्या खूप चर्चेत होत्या. सद्या फेरीवाल्यांचा प्रश्न एरणीवर असताना एक हक्काचा उमेदवार म्हणून फेरीवाल्यांनी याना आपला पूर्ण पाठिंबा दिला आहे. डोंबिवली, कल्याण अश्या अनेक विभागातील फेरीवाल्यांना हक्काची जागा मिळावी, नगरपालिकेकडून नेहमी होणारी कारवाई कुठेतरी थांबावी म्हणून कोणीही फेरीवाल्यांच्या बाजूने उभा नसल्याची खंत फेरीवाल्यानमधे होती. आता कल्याण लोकसभा मधे एक तिरंगी लढत पाहायला मिळू शकते.

## गुंडगे येथील 'डम्पिंग ग्राउंड हटाव' चा नारा

**अक्षराज : स्वप्नील देशमुख**

**दि.०४, क़र्ज़त (रायगड) :** कर्जत तालुक्यील गुंडगे गावालगत असलेल्या डम्पिंग ग्राऊंडचा प्रश्न बिकट बनला आहे. मोर्चा, मागण्या, विनवण्या करुनही हे डंम्पिंग ग्राऊंड हलविण्यात न आल्याने, गुंडगे गावासह पंचशील नगर, संत रोहिदास नगर परिसरातील नागरिकांनी लोकसभा निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे.



तसे निवेदन घनकचरा प्रकल्प हटाव संघर्ष समितीने जिल्हाधिकारींना दिले आहे.गेल्या अनेक वर्षांपासून गुंडगे गावालगत असलेल्या डम्पिंग ग्राऊंडचा त्रास या परिसरातील नागरिक सहन करत आहेत. या रोगराई पसरली आहे. अनेकांना शासनाचे त्रास होऊ लागले असून, नागरिकांच्या आरोग्याला धोका निम ाण झाला आहे.

शेतकर्यांच्या जमिनी नापीक झाल्या आहेत. या घाणीमुळे या परिसरातील विकास खुंटला आहे. तरीही कर्जत नगरपरिषदेला जाग येत नसल्याची खंत नागरिकांनी व्यक्त केली आहे. गुंडगे येथील डंम्पिंग ग्राऊंड पर्यायी जागेत हलविण्यात यावे, याकरिता कर्जत नगरपरिषद कार्यालयावर १२ जानेवारी २०२३ रोजी भव्य आक्रोश मोर्चा काढण्यात आला.

त्यानंतर कर्जत नगरपरिषदेबरोबर सतत पत्रव्यवहारदेखील करण्यात आला. कर्जत-खालापूर विधानसभेचे आमदार यांना २६ जानेवारी २०२४ रोजी पत्र देण्यात आले. जिल्हाधिकारी यांच्याकडे १८ मार्च रोजी लेखी पत्रव्यवहार करण्यात आला आहे. परंतु त्यानंतरही या गंभीर प्रश्नाकडे प्रशासनाने तसेच लोकप्रतिनिधी यांनी दुर्लक्ष केल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे आगामी होणार्या लोकसभेच्या निवडणूक प्रक्रियेवर गुंडगे गाव परिसरातील नागरिकांनी बहिष्कार टाकला आहे.

## गल्ली तेथे फळा, अवघे गावच झाले शाळा..!

### जवळ्यात उन्हाळ्याच्या सुट्टीतील उपक्रम; शालेय विद्यार्थ्यांचा मिळतोय प्रतिसाद

**दि.०४, नांदेड :** वर्षभरातील दोन्ही शैक्षणिक सत्रांत शाळांमधून अध्ययन अध्यापनासह विविध शालेय तथा सहशालेय उपक्रम राबविण्यात येत असतात. या शैक्षणिक वर्षातील दिपावलीच्या सुट्टीत सर्व विद्यार्थ्यांसाठी खाऊ हा उपक्रम राबविण्यात आला होता.

आता दोन मे पासून शाळांना उन्हाळी सुट्ट्या सुरू झाल्या आहेत. या कालावधीत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रक्रियेत खंड पडतो. तो पडू नये आणि स्वयं अध्ययनाची सवय लागावी या उद्देशाने जवळा देशमुख येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील शिक्षकांनी एक शक्कल लढवली आहे. उष्णतेची तीव्रता लक्षात घेऊन व वेळेचे योग्य नियोजन करून गल्ली तेथे आवश्यकतेनुसार शाळेचे मुख्याध्यापक गंगाधर ढवळे, विषय शिक्षक संतोष अंबुलगेकर, उम ाकांत बेंबडे, सहशिक्षक संतोष घटकार यांच्या पुढाकाराने छोट्या छोट्या फळ्यांचीच निर्मिती केली आहे. या उपक्रमास शालेय विद्यार्थ्यांचा प्रतिसाद मिळत आहे.



उन्हाळ्याच्या सुट्टीत बैठे मनोरंजनात्मक व मैदानी खेळांबरोबरच गाव खेड्यात सर्वच वयोगटातील विद्यार्थ्यांनी फळ्याचा वापर करणे अपेक्षित आहे.

याद्वारे वाचन, लेखन, गणिती क्रिया, जोडाक्षरयुक्त शब्दांचा सराव, अर्थपूर्ण इंग्रजी शब्द तयार करणे, विविध प्रकारच्या नावांची स्पेलिंग जोडून शब्द रचना तसेच छोटी छोटी इंग्रजी वाक्यरचना तयार करणे, ज्ञानरचनावादी पाढे तयार करणे आदी कौशल्य विकसित होणार आहेत.

यासाठी जवळा देशमुख येथील गल्लोगल्लीत झाडाखाली सावलीत जिथे बसून स्वयं अध्ययन करता येतील अशा पद्धतीने फळे तयार करण्यात आले आहेत.

लहान विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी साक्षी गोडबोले, वैभवी शिखरे, कृष्णा शिखरे, लक्ष्मण शिखरे, सिद्धांत गोडबोले, अजिंक्य गोडबोले, तिरुपती शिखरे आदी विद्यार्थी परिश्रम घेत आहेत. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत असून 'गल्ली तेथे फळा अवघे गावच झाले शाळा' असे बोलले जात आहे.

## तरुणाची आत्महत्या कि घातपात, चर्चेला आले उधाण



**अक्षराज : सत्यम भोसले**

**दि.०४, राहुरी (अहमदनगर) :** दोन दिवसा पासून बेपत्ता असलेला राहुरी येथील महेंद्र वैद्य या तरुणाचा मृतदेह आज दि. ४ मे २०२४ रोजी तालूक्यातील चेडगाव येथे पाटाच्या पाण्यात तरंगताना आढळून आला. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून चर्चेला उधाण आले. महेंद्र सुधीर वैद्य, वय २९ वर्षे, रा. तनपुरे वाडी, राहुरी. हा तरुण नगर क्रॉम्तन कंपनीत नोकरी करत होता. गुरुवार दि. २ मे २०२४ रोजी महेंद्र हा कामावर जातो, असे सांगून घरातून बाहेर पडला होता.

तेव्हापासून तो बेपत्ता झाला होता. महेंद्र याच्या नातेवाईकांनी दोन दिवस त्याचा परिसरात शोध घेतला मात्र तो मिळुन आला नाही. आज दिनांक ४ मे २०२४ रोजी सकाळी १० वाजे दरम्यान राहुरी तालूक्यातील चेडगाव येथील पाटाच्या पाण्यात एका तरुणाचा मृतदेह तरंगताना दिसून आला. घटनेची माहीती मिळताच पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार चंद्रकांत बऱ्हाटे, पोलिस नाईक आजिनाथ पालवे यांनी घटनास्थळी धाव घेऊन मृतदेह ताब्यात घेतला. तो मृतदेह महेंद्र सुधीर वैद्य याचा असल्याचे निष्पन्न झाले.

शवविच्छेदनानंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. सायंकाळी पाच वाजे दरम्यान महेंद्र याच्यावर राहुरी येथील गणपती घाट स्म शान भूमीत अत्यंसंस्कार करण्यात आले. या प्रसंगी अनेकांनी हळहळ व्यक्त केली. या बाबत राहुरी पोलिस ठाण्यात आकस्म ात गून्ह्याची नोंद करण्यात आली. मात्र महेंद्र वैद्य या तरुणाने आत्महत्या केली कि त्याचा घातपात झाला. नगरला राहणारा महेंद्र याचा मृतदेह चेडगाव येथे कसा मिळून आला. याबाबत तालूक्यात चर्चा सुरु आहे.

## डॉ.बाबासाहेबांचे कार्य मानवी उद्धाराचा समृद्धी मार्ग आहे : डॉ.शिवाजीराव देवनाळे

**अक्षराज : जयराम देमगुंडे**

**दि.०३, उदगीर (लातूर) :** एक शतकापूर्वी अंधाऱ्या अज्ञानी जगाने बाबासाहेब आंबेडकरांना नाकारले मात्र तेच बाबासाहेब मानवी कल्याणासाठी सर्वस्वाचा त्याग केले. आज जागतिक पटलावर डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा महाशक्ती म्हणून उदय झाला ही भारतासाठी अभिमानाची बाब.

देशातील कोणत्याच व्यक्तीला शिक्षण, राजकारण, महिला, विद्यार्थी, शेतकऱ्यांना आपल्या हक्कासाठी संघर्ष करण्याची वेळ येणार नाही याची दक्षता संविधान रूपाने घेणाऱ्या बाबासाहेब आंबेडकरांना फक्त जयंती दिवासी स्वीकारणे हे मोठे अज्ञान आहे. म हान घटना निर्माते, अर्थतज्ञ, आदर्श संसदपट्टू, समाज सुधारक, जागतिक कीर्तीचा विद्वान, महिला उद्धारक, शेतकरी उपेक्षित दुबळ्यांचा आसरा असणाऱ्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना देशातील लोकांनी उद्धाराचा राजमार्ग म्हणून स्वीकारावा त्यातच देशाचे हित आहे असे अनमोल विधान ख्यातनाम वक्ते तथा विचारवंत डॉ. शिवाजीराव देवनाळे यांनी आंबेगाव येथे बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंती निमित्त केले.

सार्वजनिक जयंती कार्यक्रमाच्या सभेचे अध्यक्ष अभंगराव शिंदे तर प्रमुख मान्यवर म्हणून प्रज्ञा मंचवार अंकुश शिंदे, पोलीस कानिस्टेबल विजयकुम ार शिंदे उपस्थित होते. श्रोत्यांना पुढे संबोधित करताना डॉ.देवनाळे म्हणाले



जयंती कार्यक्रमात प्रमुख पाहुण्यांना शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यापेक्षा शाळा - महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना बाबासाहेबांनी लिहिलेल्या मौलिक पुस्तकांची भेट द्या.

कारण वाचक पिढी उद्या देशाला वाचवणार आहे. एक दिवस जयंती साजरी करून चालणार नाही तर त्यांच्या समाज जागृतीचा अग्नी घरोघरी तेवत ठेवावा लागेल. देश आणि घटनेपेक्षा आम्ही मोठे नाही या विचारला बाळस आल्याशिवाय देशाचा विकास नाही हे सांगण्यास ते विसरले नाहीत.

या प्रसंगी काठीकर पोलीस कानिस्टेबल विजयकुमार सूर्यवंशी, अंकुश माने, अभंग शिंदे, भुजंग चलवा यांनीही बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारावर प्रकाश टाकला.

यावेळी प्राचार्य नीलकंठ बोडके, व्यंकट नवलगिरे, व्यंकट शिंदे, मिलिंद शिंदे, अशोक शिंदे, प्रकाश शिंदे, पंचशीला शिंदे, नंदनी शिंदे, सुशील शिंदे, अभंग शिंदे, बब्रुवान शिंदे, प्रभू सूर्यवंशी यासह गावकरी मंडळी कार्यक्रमांस मोठ्या संख्येनी उपस्थित होते.

## सेल्फीद्वारे मतदान जन जागृती करण्याचे आयुक्तांचे आवाहन

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०४, नवी मुंबई :** सेल्फी काढणे कोणाला आवडत नाही? सेल्फी काढण्याकरता अनेक स्टंट केले जातात. आपले सेल्फी लोकांनी पहावे याकरिता जीवावर उदार होऊन सेल्फी काढले जातात. सरकारने सूचना देऊन काही ठिकाणी अटकाव करूनही लोकं काही ऐकत नाहीत. सेल्फी काढता काढता अनेकांचे जीव गेलेले आहेत. परंतु सेल्फी ची क्रेझ काही कमी होताना दिसत नाही.

याच गोष्टीचा उपयोग मतदान जागृती करिता का करून घेऊ नये? असा विचार म नात आल्यानंतर नवी मुंबई महानगरपालिका आयुक्तांनी त्याचा वापर करून घेण्याच्या विचार केला. त्यानुसार त्यांनी आपल्या महानगरपालिका कार्यक्षेत्रातील आणि आकर्षक असणाऱ्या सर्व केंद्रांवर सेल्फी पॉईंट निर्माण केला आहे. त्याला नागरिकांचा चांगला प्रतिसादही मिळत आहे. मतदार जनजागृतीचे सेल्फी स्टँड तयार करून ते महानगरपालिका मुख्यालयासह आठही विभाग कार्यालये तसेच ऐरोलीचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक, वंडर्स पार्क, निसर्गोद्यान, मनपा रूग्णालये व इतर मनपा कार्यालयांमध्ये ठेवण्यात आले आहेत. विष्णुदास भावे नाट्यगृहातही सेल्फी स्टँड ठेवण्यात आला असून तेथेही कलाकार आणि नाट्यरसिक यांचा चांगला प्रतिसाद लाभत आहे. अनेक कलावंतानी तर नाट्यगृहात प्रयोगासाठी आल्यानंतर




नागरिकांना मतदान करण्याविषयी आवाहन करणारे रिल्स बनवून सामाजिक बांधिलकी जपलेली आहे. लोकशाही बळकट करणे हे आपल्या प्रत्येकाचे कर्तव्य असून त्याकरिता संविधानाने आपल्याला दिलेला मतदानाचा अधिकार हक्काने बजावावा असा संदेश आयुक्तांनी मुख्यालयात स्वतः सेल्फी काढून दिलेला आहे.

नवी मुंबई नागरिकांनी या सेल्फी स्टँडवर आपले सेल्फी छायाचित्र काढून ते सोशल मिडियाच्या फेसबुक, इन्स्टाग्राम, एक्स, व्हॉट्सॲप आणि इतर लोकप्रिय समाज माध्यमांतून प्रसारित करावे आणि स्वतः मतदान करावेच व इतरांनाही म तदान करण्याविषयी सेल्फीच्या माध्यमातून प्रोत्साहित करावे असे आवाहन करण्यात येत आहे.

## अविनाश शिळीमकर पोलिस महासंचालक सन्मान चिन्हाने सन्मानित

**अक्षराज : सत्यम भोसले**

**दि.३ राहुरी (अहमदनगर) :** राहुरी येथे काही महिन्यातच आपल्या कामाच्या जोरावर सर्व सामान्य नागरिकांच्या मनात घर करणारे पोलिस निरीक्षक अविनाश शिळीमकर यांना महाराष्ट्र दिनी पोलिस महासंचालक सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात आले. पोलिस निरीक्षक अविनाश शिळीमकर हे राहुरी पोलिस ठाण्यात असताना काही काळातच त्यांनी टारगट व गुन्हेगारांवर वचक बसवीला होता. तालूक्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यात त्यांना यश आले होते. एक कर्तव्य परायण व दबंग अधिकारी म्हणून त्यांनी राहुरीकरांच्या मनात घर केले होते. त्यांनी नागपुर शहर, सातारा, मुंबई शहर व अहमदनगर अशा विविध जिल्ह्यात आपले कर्तव्य बजावले. सध्या ते पुणे ग्रामीणला एलसीबीचे जिल्हाप्रमुख म्हणून कार्यरत आहे. त्या ठिकाणी देखील त्यांनी गुन्हेगारांवर वचक बसवून कायदा व सुव्यवस्था अबाधित राखली. तसेच अनेक गुन्हे उघडकीस आणले. त्यांच्या या उत्कृष्ट व प्रशंसनीय सेवेबद्दल जिल्हा पोलिस प्रमुख पंकज देशमुख यांच्या हस्ते १ मे महाराष्ट्रदिनी पोलीस महासंचालक सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. यावेळी पोलिस निरीक्षक अविनाश शिळीमकर यांनी बोलताना सांगीतले कि, ह्याचे श्रेय मी माझे सहकारी, एलसीबी टिम व पुणे ग्रामीण पोलीस दलाला देत आहे. या पुर्वी सेवा बजावलेल्या अहमदनगर, नागपुर शहर, सातारा, मुंबई शहर येथील माझे सहकारी व वरिष्ठ अधिकारी यांचेही मोलाचे सहकार्य लाभले आहे.तसेच त्यांनी सर्व सन्मान प्राप्त सहकारींचे अभिनंदन करुन त्यांना साथ देणाऱ्या सर्व सहकाऱ्यांना मनः पूर्वक धन्यवाद दिले. पोलिस निरीक्षक अविनाश शिळीमकर यांच्या यशाबद्दल राहुरी तालूक्यातील अनेक जणांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून त्यांना शुभेच्छा दिल्या.

## रोहित्राअभावी बारड परिसरातील उभ्या केळीच्या बागा करपल्या

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.०४, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड तालुक्यातील बारड येथील ३३ के व्ही उपकेंद्र अंतर्गत तीन रोहित्री जळाल्याने केळीच्या उभ्या बागा जागेवर करपत आहेत देवी डीपी, नारायण डीपी, के एम डीपी चा समावेश असून महावितरणाच्या तगाद्यामुळे शेतकऱ्यांनी सावकारी व्याजाने पैसे काढून बिलाची रक्कम अदा केली असून यासंबंधीचा अहवाल संबंधित कार्यालयाने वरिष्ठांकडे पाठविला आहे परंतु वरिष्ठ अधिकारी मात्र ऑइल नाही रोहित्री नाही असे कारणे दाखवून शेतकऱ्यांच्या कडेलोट करीत आहेत स्थानिक महावितरणाचे अधिकारी मात्र अहवाल पाठविल्याचे सांगून शेतकऱ्यांच्या प्रश्नांना कोलदांडा दाखवीत आहेत

शेतकऱ्यांच्या बाबतीत कायमच प्रशासन उंटावरून शेळ्या हाकण्याच्या प्रयत्नात असतात याची प्रचिती बारड भागातील केळी उत्पादक शेतकऱ्यांना पुन्हा पुन्हा येत असून रोहित्री अभावी केळीच्या बागाच करपत असुन शेतकऱ्यांचे काळीजही जळतेय अशी परिस्थिती या भागात पहावयास मिळते महावितरणचे अधिकारी उष्णतेच्या लाटेत गारेगार होण्यासाठी चौपाटीचा आसरा घेताना दिसत आहेत. त्यामुळे एकीकडे रोहित्री अभावी शेतकऱ्यांचा दैवदुर्विलास पहावयास मिळत असताना महावितरणचे अधिकारी मात्र थंड हवेची ठिकाण शोधत आहेत. या भागात केळीचे पीक मोठ्या प्रमाणात शेतकरी घेत असतात परंतु रोहित्री जळल्याने केळीच्या उभ्या बागा करपत असून शेतकऱ्यांचे जणू काळीज जळत आहे विज नसल्याने शेतकरी अत्यंत दुःखात दिसून येत आहे. आठ तास शेतकऱ्यांना वीज उपलब्ध होत असते त्यातही आता रोहित्रीच नसल्याने १२ महिने जोपासलेले पिक डोळ्यासमोर वाळून जात असताना शेतकऱ्यांचे अश्रूच ओघळत नसून आता रक्तही ओघळत असल्याचे चित्र बारड भागात दिसून येत आहे. तेव्हा कुंभकर्णीय झोपेत असलेली महावितरणची व्यवस्था कधी जागी होणार हेच पाहावे लागेल!

# समाजवादावर विचारांचा प्रचंड प्रभाव! कार्ल मार्क्स जयंती विशेष



कार्ल मार्क्स हे १९ व्या शतकातील एक जर्मन अर्थशास्त्रज्ञ व तत्त्वज्ञ होते. त्यांनी अनेक विषयांवर लिखाण केले पण त्यांचे वर्गसंघर्षावरील लिखाण हे जास्त प्रसिद्ध आहे. फ्रेडरिक एन्जेल्सप्रमाणे मार्क्सने देखील तत्कालिन राजकीय लढ्यांमध्ये भाग घेतला. कार्ल मार्क्स यांनी दास कॅपिटाल या ग्रंथाचा पहिला खंड इ.स.१८६७मध्ये प्रसिद्ध केला. कार्ल मार्क्स यांच्या विचारांची लोकप्रियता सोव्हिएट रशियाच्या विघटनानंतर कमी झाली असली तरी ते विचार शिक्षण क्षेत्र, राजकीय क्षेत्र, कामगार लढा यामध्ये अजूनही लोकप्रिय आहेत. मार्क्स यांचे विचार अनेक कम्युनिस्ट राज्ये आणि राजकीय चळवळींमध्ये अजूनही आदर्श मानले जातात. ते वर्ग संघर्षाचे प्रणेते होते.

डॉ.कार्ल मार्क्स यांचा जन्म दि.५ मे १८१८ रोजी जर्मनीतील ट्रायर या गावी झाला. त्यांचे वडील –हाईनलँड येथे वकिलीचा व्यवसाय करीत असत. बॉन विद्यापीठात विधी शाखेची पदवी मिळवल्यानंतर त्यांनी बर्लिन विद्यापीठात डॉक्टरेट पदवी मिळविण्यासाठी प्रवेश घेतला. इ.स.१८४१मध्ये त्यांचा प्रबंध मान्य होऊन त्यांच्या नावामागे डॉक्टर ही उपाधी लागली. डॉ.मार्क्स यांचा सामाजिक चळवळीवरील प्रभाव अतुलनीय आहे. ते स्वतः एक उत्कृष्ट अर्थशास्त्रज्ञ व तत्त्वज्ञ होते. जर्मनीतील जेना विद्यापीठामध्ये कायदा आणि तत्त्वज्ञानाचे शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी पत्रकार म्हणून काम सुरू केले. डॉ.कार्ल मार्क्स यांनी इ.स.१८४८ रोजी कम्युनिस्ट विचारसरणीचा पाया घातला. फ्रेडरिच एन्जेल्स यांच्या सहकार्याने लिहिलेल्या कम्युनिस्ट मॅनिफेस्टोत त्यांनी कामगार–मजूर वर्गाने क्रांती करून कम्युनिस्ट समाज स्थापन करावा असा विचार मांडला. मार्क्स यांनी स्वतः समाजवादाची स्थापना केली नसली तरी समाजवादावर त्यांच्या विचारांचा खूप मोठा प्रभाव आहे. त्यांच्या स्फोटक विचारांमुळे त्यांना पॅरिस, ब्रसेल्स आणि नंतर लंडन येथे हद्दपार करण्यात आले. फ्रेडरिक एन्जेल्स यांनी मार्क्स यांच्या टिपणांच्या आधारे दास कॅपिटालचे उर्वरीत दोन खंड लिहून प्रसिद्ध केले.

कार्ल मार्क्सच्या शास्त्रीय समाजवादात द्वंद्वात्मक भौतिकवाद, ऐतिहासिक भौतिकवाद, अतिरिक्त मूल्य सिद्धांत, वर्गसंघर्ष, राज्यविहीन व वर्गविहीन समाज या साऱ्या विचारांचा समावेश होतो. धर्म दुबळ्या माणसाला भ्रामक सुख, आभासात्मक सुख देतो. त्याची ती गरज आहे, भ्रम आहे. धर्माच्या रूपाने व्यक्त होणारे दुःख हे एकाच वेळी खऱ्या दुःखाचे प्रकटरूप असते आणि त्याच वेळी तो खऱ्या दुःखाचा निषेधही असतो. धर्म हा दबलेल्यांचा, दीनदुबळ्यांचा आवाज असतो. धर्म हृदयशुन्य जगाचे हृदय असते. धर्म हा निरुत्साही परिस्थितीतला उत्साह असतो. धर्म लोकांची अफू आहे. खरे सुख न देता, तो अफूसारखी गुंगी देतो. उत्पादन व्यवहार, उत्पादनशक्ती, उत्पादनसंबंध, त्यातील अंतर्विरोध, खाजगी मालकी, शासनसंस्था, विचारसरणी, क्रांती इत्यादी मूलभूत संकल्पनांचा विचार करून मार्क्सने मानवाचा उत्पादन व पुनरुत्पादनाचा व्यवहार, त्यातील उत्पादनशक्ती व उत्पादनसंबंध यांचे द्वंद्वात्मक नाते यांच्या आधारे इतिहासाचा तसेच त्याच्या काळातील वर्तमानाचा अभ्यास केला. या अभ्यासातूनच त्याने निष्कर्ष काढला की मानवी इतिहास हा वर्गलढ्याचा इतिहास आहे व उत्पादनसाधनांवरची भांडवली खाजगी मालकी हे आजच्या सर्व प्रश्नांचे मूळ आहे.

हेगेलच्या म्हणण्यानुसार मानवी मनात एक विचार निर्माण होतो– वाद, त्याच्यातील उणिवा किंवा अंतर्विरोध म्हणजे प्रतिवाद असतो. वाद व प्रतिवादाच्या संघर्षात्मक समन्वयातून सुसंवाद निर्माण होतो आणि ही प्रक्रिया अव्याहतपणे सुरू राहते. जाणिवा या इतिहासाच्या चक्रातील प्रेरक घटक असतात असे हेगेलचे म्हणणे होते. मार्क्सला मात्र जडद्रव्य किंवा पदार्थ अधिक महत्त्वाचे वाटले. मार्क्सने विचाराऐवजी पदार्थ महत्त्वाचा मानला. पदार्थ हेच मार्क्सने अंतिम सत्य मानले. आपल्या प्रतिपादनाच्या पुष्ट्यर्थ त्याने आधी भूमी पाहिल्यावरच माणसाच्या मनात बी पेरण्याचा विचार आला, असा दृष्टांत दिला. दास कॅपिटल या ग्रंथात मार्क्स म्हणतो, हेगेलचे तत्त्वज्ञान डोक्यावर उभे असल्याचे पाहून मी त्याला पायावर उभे केले. पदार्थ अस्तित्वात येतो, विकसित होतो, कालांतराने नष्ट होतो व त्यातून नवीन पदार्थ निर्माण होतो. द्वंद्व–परिवर्तन–विनाश–निर्मिती अशी प्रक्रिया सदोदित चालू राहते. 'जाणीवबुद्धी' ही भौतिक जगाच्या प्रदीर्घ उत्क्रांतीची केवळ एक निर्मिती मात्र आहे, असे भौतिकवादी म्हणतात. तत्त्वज्ञांनी वेगवेगळ्या मार्गांनी जगाचा केवळ अर्थ लावला आहे; पण मुख्य मुद्दा आहे तो जग बदलविण्याचा. मार्क्सने इतिहासाचा भौतिक अन्वयार्थ– इकॉनॉमिक इंटर्प्रिटेशन ऑफ हिस्ट्री असा शब्दप्रयोग केलेला आहे. इतर संज्ञा फ्रेड्रिख एन्जेल्सने रूढ केलेल्या आहेत. राज्याचा आधार पाशवी शक्ती हाच असतो. वर्गीय हितसंवर्धनाच्या गरजेतून शोषकांनी राज्याची निर्मिती केली. सर्वांचे कल्याण हा कधीच राज्याचा हेतू नसतो. राज्ये सर्वांच्या कल्याणासाठी नसल्यामुळे ती विलयाला गेलीच पाहिजेत. मार्क्सच्या मते हातांनी करायचे काम हे बौद्धिक कामापेक्षा अधिक महत्त्वाचे असते.

उत्पादन ही सामाजिक अभिक्रिया आहे. तिच्यामुळेच समाज उदयाला आला. 'माणूस हा निसर्गतः सामाजिक आहे, उदारमतवादच्या म्हणण्याप्रमाणे तो अण्वात्मक नाही. असे मार्क्सचे म्हणणे आहे. एकदा समाजाची आर्थिक संरचना कळाली की समाजातील इतर संरचना सहजपणे समजून घेता येऊ शकतील, असे मार्क्सला वाटते. इमल्याचा पायावर अजिबात प्रभाव पडत नाही, असे मार्क्सचे म्हणणे नव्हते या गोष्टीवर भा.ल.भोळे जोर देतात. आर्थिक संरचनेमध्ये उत्पादनाची साधने, उत्पादनाचे प्रेरक आणि उत्पादनाचे संबंध यांचा समावेश होतो. उत्पादनाच्या साधनांना उत्पादनाचे घटक अशीही संज्ञा आहे. सरंजामशाहीत जमीन हा तर भांडवलशाहीत भांडवल हा उत्पादनाचा घटक असतो. उत्पादनाच्या प्रेरकांमध्ये उत्पादनासाठी कोणत्या प्रकारचे बल वापरले जाते किंवा कोणत्या प्रकारची यंत्रसामग्री किंवा तंत्रज्ञान वापरले जाते याचा समावेश होतो. उत्पादनाच्या संबंधांमध्ये असलेले आणि नसलेले असे दोन गट येतात. या दोन गटांच्या हितांमध्ये मेळ बसत नसल्याने वर्गसंघर्षास प्रारंभ होतो. इतिहासपूर्व अवस्था, गुलाम बाळगणारा समाज, सरंजामशाही, भांडवलशाही आणि साम्यवाद अशा इतिहासाच्या पाच अवस्था मार्क्सने सांगितलेल्या आहेत. भांडवलदार ज्याप्रमाणे माणसाचे शोषण करतात, त्याचप्रमाणे ते निसर्गाचेही शोषण करतात. नफा कमावणे हा त्यांचा एकमेव हेतू असल्याने नफा कमावण्यासाठी ते माणसाचे शोषण करतात, त्याचप्रमाणे ते निसर्गाचेही शोषण करतात. शासनसंस्था, राजसत्ता हे प्रस्थापितांच्या हातामध्ये ठेवून समाजाचे परिवर्तन करता येणार नाही.

मार्क्सला श्रमविभागणी मान्य आहे. अगदी प्रागैतिहासिक काळातही स्त्री–पुरुष आणि शिकारी व अन्नसंग्राहक अशी विभागणी असू शकते. मात्र विशिष्ट प्रकारचे श्रम करणारा श्रेष्ठ आणि बाकी हलक्या दर्जाचे अशी परिस्थिती निर्माण होणे हे संघर्षाचे मूळ ठरले असेल, असे तो म्हणतो. उदाहरणार्थ सरंजामशाहीत बुद्धिजिवींची कामे ही श्रेष्ठ दर्जाची समजली जात होती. बुद्धिजीवी आणि गुलाम अशी विभागणी ही पहिली अनैसर्गिक श्रमविभागणी होती, असे मार्क्स म्हणतो. प्लेटो आणि ॲरिस्टॉटल यांनी भौतिक श्रमांपेक्षा तर्कबुद्धी श्रेष्ठ या भूमिकेचे समर्थन केले होते. कल्पना किंवा जाणिवा या पदार्थापेक्षा श्रेष्ठ आहेत अशी भूमिका घेण्यामागे आणि प्रत्येकामधील तर्कबुद्धीचा अंश एकसारखा नसतो असे म्हणण्यामागे फार मोठे उद्दिष्ट आहे, असे मार्क्सला वाटते. उत्पादनाच्या पद्धतीतील हिंसात्मक बदल म्हणजे क्रांती. खऱ्या जाणिवा आणि चुकीच्या जाणिवा असा भेद मार्क्सने केला आहे. आपल्या जाणिवांवरून आपले अस्तित्व ठरत नसून आपल्या अस्तित्वाचा आपल्या जाणिवांवर निर्णायक प्रभाव पडतो असे मार्क्स म्हणतो. आपण राहत असलेल्या जगाचे खरे स्वरूप श्रमिकांनी समजावून घेतले पाहिजे. आपल्या शोषणाची जाणीव त्यांना झाली पाहिजे. विचारप्रणाली किंवा धर्माच्या अफूने श्रमिकांची दिशाभूल होते, असेही मार्क्सला वाटते. अशा या विचारवंताचे दि.१४ मार्च १८८३ रोजी दुःखद निधन झाले.

**!! कार्ल मार्क्स यांना त्यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन !!**

**– संकलन व शब्दांकन –**
**श्रीकृष्णदास (बापू) निरंकारी.**
**रामनगर, गडचिरोली.**
**फक्त मधुभाष– ७७७५०४१०८६**

# शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाला खिंडार



**अक्षराज : सुरज महाडिक**

**दि.०४, माणगांव (रायगड) :** ऐन लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर इंदापूर विभागात उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना गटाला खिंडार लागला असून राष्ट्रवादी काँग्रेस युवक सचिव तथा ग्रा. पं. भुवन सरपंच दिपक जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली महायुतीचे उमेदवार खा. सुनील तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत निळज सरपंचांसह ग्रामस्थांनी दि. ३ मे रोजी अशोकदादा साबळे विद्यालय माणगांव येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर पक्ष प्रवेश केला आहे.

यावेळी ग्रा. पं. निळज सरपंच द्वारकानाथ उभारे, सदस्य अमर कोंडे, अश्विनी अमोल उभारे, माजी सरपंच श्रीराम ढमाले, माजी सदस्या संजीवनी उभारे, तरुण नेतृत्व उदय उभारे, तंटामुक्ती अध्यक्ष महादेव हरी उभारे तसेच बहुसंख्य ग्रामस्थ, महिला मंडळ व तरुण मंडळ यांनी यावेळी पक्ष प्रवेश केला.

यावेळी प्रवेशकर्त्यांनी सांगितले की, आमचं गाव विकासकामांपासून वंचित राहील होत. खा. सुनील तटकरे यांनी संपूर्ण रायगड जिल्ह्यात लावलेला विकासकामांचा धडाका व त्यांची कार्यप्रणाली यावर प्रभावित होऊन पक्ष प्रवेश केल्याचे सांगितले. खा. तटकरेंना लोकसभा निवडणुकीत मतपेटीतून भरभरून मतदान करून मताधिक्य देण्यात येईल.

यावेळी खा. सुनील तटकरे म्हणाले की, ज्या वेळी माणस विचारसारणीशी जोडली जातात. त्यावेळी ते एकाच प्रवाहात येतात. निळज ग्रामस्थांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व माझ्यावर दाखविलेला विश्वास नक्कीच सार्थ ठरविला जाईल. यावेळी शिवसेना प्रवक्ते ॲड. राजीव साबळे, माजी नगराध्यक्ष आनंद यादव, रा. कॉ. जेष्ठ नागरिक सेल जिल्हाध्यक्ष शेखर देशमुख, जेष्ठ नेते बाळाराम नवगणे, माजी सरपंच उदय अधिकारी, उपसरपंच समीर मेहता, तालुकाप्रमुख ॲड. महेंद्र मानकर, राष्ट्रवादी काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# टाकराळा मोटर सायकल अपघातात दोघे ठार



**अक्षराज : बालाजी गायकवाड**

**दि.०४, हदगाव :** तालुक्यातील तामसा येथून जवळच असलेल्या टाकराळा फाटा या ठिकाणी रस्त्याच्या बाजूला थांबलेल्या कांदुरी खाऊन भोकर कडे परत जाणाऱ्या नातू आणि आजोबा याना मोटार सायकल ने उडविले असून ते दोघे जागीच ठार झाले असल्याची घटना दि.३ मे रोजी १० :१५ वाजता घडली मयताचा भोकर येथील मुस्लिम स्मशान भूमी या ठिकाणी अंत्यसंस्कार करण्यात आले

भोकर येथून खाजामिया हसन पठाण वय ६५ वर्ष व त्यांचा नातू सलमान अमजद पठाण वय वर्ष ९ हे आपले नातेवाईक यांच्या कडे कदोरी खाण्यासाठी दि.३ मे रोजी हिमायतनगर तालुक्यातील सोनारी फाटा या ठिकाणी गेले होते परत भोकर कडे वापस आपल्या तीन चाकी अटो मद्ये जात असताना आटो गरम झाल्याने रस्त्याच्या बाजूला उतरून थांबले होते तेव्हा भोकर कडून हिमायतनगर कडे जाणाऱ्या भरधाव मोटारसायकल ने रस्त्याच्या बाजूला उभे असलेल्या खाजामिया हसन पठाण व नातू सलमान अमजद पठाण यांना जोराची धडक दिली या मद्ये खाजामिया हसन पठाण गे जागीच ठार झाले तर ९ वर्षाचा सलमान अमजद पठाण हा गंभीर जखमी झाला होता या ठिकाणी त्यांची आई यांनी मदत मागितली होती तेव्हा भोकर येथील तहसील कर्मचारी सिद्धार्थ सोनसळे यांनी आपल्या कार मद्ये सलमान अमजद पठाण याला नांदेड येथे उपचार साठी नेत असताना रस्त्या मद्ये मृत्यू झाला या ठिकाणी सलमान अमजद पठाण हा एकलुता एक पाच बहिनीलतील मुलगा होता तो सर्वाचा लाडका होता भोकर येथील वडार गल्ली मधील तो वास्तव्य करीत होता या ठिकाणी त्याच्या निधनाने पठाण परिवारावर दुःखाचा सावट पडले असून त्यांचा अंत्यविधी भोकर येथील मुस्लिम स्मशान भूमी या ठिकाणी ४ मे रोजी दुपारी २ वाजता करण्यात आले असून तामसा वर्त लीही पर्यंत तामसा पोलीस ठाणे या ठिकाणी कोणताही गुन्हा दाखल झाला नव्हता तामसा पोलीस ठाणे येथील शिवराम तुगावे यांनी घटना स्थली भेट देऊन पाहणी केली.

# पोलीस निरीक्षक हर्षवर्धन बारवे पोलीस महासंचालक सन्मानचिन्हाने सन्मानित



**अक्षराज : सुनिल फर्डे**

**दि.०४, शहापूर (ठाणे) :** ठाणे जिल्ह्यातील वासिंद पोलिस ठाण्याचे वरीष्ठ पोलिस निरीक्षक हर्षवर्धन शंकरराव बारवे यांनी नुकतीच राज्य पोलीस दलात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल, त्यांना पोलिस महासंचालक सन्मानचिन्ह जाहीर झाला आहे.येत्या १५ ऑगस्ट प्रजासत्ताक दिनी त्यांना गौरविण्यात येणार आहे. बारवे यांचा जन्म मुक्काम चासगाव तालुका आंबेगाव या छोट्याश्या गावात कष्टकरी शेतकरी कुटुंबात झाला असून,त्यांचे जुन्नर मधील अण्णासाहेब आवटे विद्यामंदिर येथ माध्यमिक शिक्षण तर कोल्हापूर येथे बी.एस.सी.ॲग्री झाले असून नंतर कृषी विद्यापीठात एम.एस.सी एग्री तसेच मुंबई विद्यापीठातुन एल.एल.बी पूर्ण केलं आहे.दरम्यान सन २००२ मध्ये लोकसेवा आयोगामार्फत पोलिस उपनिरीक्षक पदावर निवड झाली.आणि विशेष म्हणजे नक्षलग्रस्त गडचिरोली जिल्ह्यात सतत तीन वर्षे महत्वपूर्ण सेवा दिलेली आहे.

त्यानंतर नवी मुंबई, पालघर, रायगड, पोलिस प्रशिक्षण केंद्र सोलापूर तसेच महामार्ग सुरक्षा पथक येथे उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. विविध पोलिस ठाण्यात कार्यरत असतांना गुन्ह्यातील तपासात त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे.तरी बारवे यांना या अगोदरही २०२१ मध्ये राज्य शासनाचा आदर्श अधीक्षक म्हणून प्रथम क्रमांक पटकवीत राज्य शासनाच्या सन्मान चिन्हासह रोख रक्कम तीस हजार रुपये देऊन सन्मानित केले गेलं आहे. तसेच विशेष सेवा पथक व अंतर्गत सुरक्षा पदकानेही त्यांना सन्मानित केले गेलं आहे. सध्या ते ठाणे जिल्ह्यातील वासिंद पोलिस स्टेशन चे वरिष्ठ पोलिस निरीक्षक म्हणून कार्यरत आहेत. सन्मानमूर्ती हर्षवर्धन बारवे यांच्यावर वासिंद पोलिस ठाणे स्टाफ तथा वासिंद विभागातील नागरिकांकडून अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# ओमप्रकाश निंबाळकर यांच्या विजयासाठी भारत जोडो अभियान कटिबद्ध




**अक्षराज : सतिश तवले**

**दि.०३, कळंब :** संविधान आणि लोकशाही मोडीत काढू पाहणाऱ्या आरएसएस भाजपा सरकारला सत्तेतून पायउतार करण्यासाठी आणि महाविकास आघाडीच्या ओमप्रकाश निंबाळकर यांच्या विजयासाठी भारत जोडो अभियान कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन भारत जोडो अभियानाचे राज्य समन्वयक साथी सुभाष लोमटे,संभाजीनगर यांनी संविधान बचाव परिषदेमध्ये कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करतानी केले. पर्याय संस्थेच्या हॉलमध्ये करीम हावरे यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २ मे २०२४ रोजी दुपारी ५.०० वाजता संविधान बचाव – देश बचाव परिषद संपन्न झाली. या परिषदेमध्ये डॉ. स्मिता शहापूरकर धाराशिव,साथी बळवंत मोरे नांदेड,साथी आप्पाराव मोरताटे परभणी, साथी मेजर सुखदेव बन संभाजीनगर, ज्योती सपाटे, सायसराव जाधवर आदींनी भारत जोडो अभियानाची धाराशिव लोकसभा निवडणुकीची रणनिती विषद करून महाविकास आघाडीचे ओमप्रकाश निंबाळकर यांना प्रचंड मतानी निवडून आणण्याचा निर्धार व्यक्त केला. या परिषदेची प्रस्तावना जिल्हा समन्वयक तथा स्वराज इंडियाचे जिल्हाध्यक्ष सुभाष द.घोडके यांनी केली.सुत्रसंचालन प्रा. अविनाश घोडके यांनी केली तर आभार ज्ञानदा बहुद्देशीय संस्थेचे बंडू ताटे यांनी मानले. सुभाष घोडके लिखित सत्य घटनेवर आधारित असलेली साक्षी कादंबरी व साक्षी पावनज्योतचा महाराष्ट्र दिन विशेषांक देवून मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. या परिषदेस सुरेखा जगदाळे, आम्रपाली काळे, श्याम तोडकर आदी प्रमुख कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# नाशिक शहरात टोइंग सुरू, नागरिक संतप्त



**अक्षराज : निवृत्ती शिंदे**

**दि.४, नाशिक :** शहर पोलिसांनी टोइंगला 'वाट' मोकळी करून दिली आहे. तीन वर्षांपूर्वीच्या जुन्याच कंत्राटाला पुन्हा मुदतवाढ देत बेशिस्त वाहने टोइंग करण्याचा निर्णय पोलिस आयुक्तालयाच्या वाहतूक शाखेने घेतला आहे. त्यामुळे वाहनांऐवजी टोइंगला 'जागा' दिल्याचे म्हणत नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

पुरेशी पार्किंग उपलब्ध केल्याशिवाय टोइंग सुरू करू नका, अशा तीव्र प्रतिक्रिया नागरिकांमधून उमटत आहेत.शहरात वाहनतळांची संख्या अपुरी असून, अनेक ठिकाणी रस्त्यालगत मोठ्या प्रमाणात अतिक्रमण आहे. त्यामुळे पहिल्यांदा वाहनांसाठी पुरेशी जागा आणि वाहनतळांची निश्चिती होणे अपेक्षित होते. परंतु, पोलिस आयुक्तालयाने थेट टोइंगला मंजुरी देत कंत्राटाला मुदतवाढ दिल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. बेशिस्त वाहन चालकांना जरब लावण्यासाठी ७ एप्रिल २०२२ च्या करारातील नमूद अटी–शर्तींसह दरानुसार मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यानुसार १ मेपासून नाशिकमध्ये पुन्हा टोइंग सुरू केल्याचे वाहतूक शाखेने सांगितले. दरम्यान, नागरिकांनी नियमांचे पालन करावे. रस्त्यावर बेशिस्तरित्या वाहने उभी करू नयेत. अन्यथा, वाहने टोइंग करून दंड आकारला जाईल, असे आवाहन पोलिस आयुक्तालयाने केले आहे.